# प्रस्तावना

व्यवसाय शिक्षण कार्यक्रमांतर्गत पूर्व माध्यमिक स्तरावर व +२ स्तरावर व्यवसाय अभ्यासक्रम योजना शासकीय व अशासकीय संस्थांच्या माध्यमातून राबविण्यात येतात. व्यवसाय अभ्यासक्रमांतर्गत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थांची प्रवेशक्षमता ३.४४ लाख एवढी आहे. राज्यात औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून उद्योगाला लागणारे कारागीर तयार केले जातात व राज्यात त्यांची मोठया प्रमाणात मागणी आहे. त्याचप्रमाणे असंघटीत सेवा उद्योगात ९२ टक्के रोजगाराच्या संधी आहेत, परंतु त्याचप्रकारचे प्रशिक्षित उमेदवार सेवा उद्योगास उपलब्ध होत नाहीत. नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनने प्रसिध्द केलेल्या सर्व्हेक्षणात बँकिंग, इन्श्युरन्स, ऑटोमोबाईल, कन्स्ट्रक्शन, रिटेल व मेडिकल सर्व्हिसेस या क्षेत्रात मोठया प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. तथापि, त्याचप्रकारचे प्रशिक्षित उमेदवार त्यांना उपलब्ध होत नाहीत. या प्रकारचे व्यवसाय अभ्यासक्रम व्यवसाय शिक्षणाच्या माध्यमातून शिकविले जातात. तथापि, त्यांचा दर्जा, मागणीप्रमाणे केल्यास या अभ्यासक्रमास मोठया प्रमाणात मागणी येईल. मा. पंतप्रधानाचे २०२२ पर्यंत ५० कोटी मनुष्यबळ प्रशिक्षित करण्याचे स्वप्न आहे, या करिता ज्या संस्थांना खरोखरच कौशल्य विकासाचे काम करावयाचे आहे, अशा इच्छूक संस्थांकडून व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम कायम विनाअनुदान तत्वावर राबविण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. या अभ्यासक्रमाबद्दलची सविस्तर माहिती, निकष व अन्य पुरक माहिती तसेच कोणते अभ्यासक्रम सुरु करावेत याबाबत निर्णय घेण्यास, ही माहिती पुस्तिका उपयुक्त ठरेल.

**जयप्रकाश भुतांगे**
**संचालक, व्यवसाय शिक्षण.**